**International Journal of Advance and Applied Research**
**www.ijaar.co.in**
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.10 No.4** **Mar – Apr 2023**

# डोंगरगाव नाका म्हणजे अविस्मरणीय क्षणांची एक सुंदर आठवण

**शंकर देवराव लेकुळे**
(प्राथमिक शिक्षक) ,जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा कोंढुर
मु. पुयना पो. सांडस ता. कळमनुरी जि. हिंगोली
***Corresponding Author-* शंकर देवराव लेकुळे**
Email : shankar.lekule@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.7776781**

डोंगरगाव नाका म्हणजे अविस्मरणीय क्षणांची एक सुंदर आठवण आहे त्या आठवणीना एकत्र करूनच हा लेख लिहिला आहे यात मग काही कडू तर काही गोडही आठवणी होत्या पावसाळयाच्या सुरुवातीच्या दिवसांत आमच्या कुणाकडेच रेनकोट नव्हते मग.जाताना भिजून गेलो की श्री नारायण चव्हाण यांच्या घरून टॉवेल आणून अंग पूर्ण कोरडे करावे लागत होते .

मंदिरासमोरील वर्गात इयत्ता चौथीच्या मराठी विषयातील **सांकव** पाठ शिकवत असताना त्या पाठात मुलांनी शाळेत यायला अडसर ठरणाऱ्या ओहोळावर लाकडापासून सांकव तयार करण्याच चित्रीकरण या पाठात करण्यात आले होते यातून बोध घेत लगेच दुपारी ओंमकार भोजे,अक्षय भोजे,शंकर भोजे यांनी त्यांच्या घरासमोरून जाणाऱ्या पाण्यावर सांकव हा पाहण्यासारखा पूल तयार केलायाच वर्गात पाठीमागे थोडासा ओट्यासारखा भाग होता पण पूर्णपणे खराब हो .ता तोच भाग मुलानी स्वतः सिमेंट, वाळू आपल्या घरून आणून स्वच्छ ओटा तयार केला होत. त्या अगोदर त्या ठिकाणी भेगा पडून बीळ तयार झालेली होती कुणालाही त्या ठिकाणी बसणे शक्य नव्हतं पण आता ओटा तयार झाल्याने चित्रपट ग्रहाप्रमाणे आता बाल्कनीच त्या ठिकाणी तयार झाली होती,निरुपयोगी भाग उपयोगात आणला गेला होताआम्ही जेव्हा शाळेवर नियुक्त झालो तेव्हा फक्त पाचवीपर्यंतच वर्ग होते त्यानंतर मुलांची खूप हेळसांड . .होत होती म्हणून आपल्याला त्रास झाला तरी चालेल पण वर्ग वाढवायचाच हा निर्णय आम्ही घेतला2016 साली वर्ग सहावा , 2017 ल ा सातवा वर्ग वाढवला त्या मुलांना शिकवायला शिवाजी मस्के व सीमा पाईकराव यांची नेमणूक केली होतीत्यांचा पगार . एवढी 153 या वर्षीची विद्यार्थी संख्या 2017 शिवा मस्केला मास्तर हे नाव तेव्हापासूनच पडले.लोकसहभागातून दिला जात होता .झाली होती

१५ ऑगस्ट २००८ यावर्षी तर राठोड सर व मी हिंगोलीला जाऊन निर्मल नर्सरी मधून अशोक, कदम, गोल्डनटोरंटो, अलिस्को अशी दोन हजार रुपयांची झाडे विकत आणली. येताना उशीर झाल्याने राठोड सर यांच्या घरीच मुक्काम करावाउद्या पु .न्हा सरांसोबत झाडे गाडीवर घेऊन शाळेला निघालो. आम्ही नारायण शिरफुले व मुलांना सोबत घेत संपूर्ण शाळा हिरवीगार करून टाकलीत्या रोपांना . कटघरे करण्यासाठी सुभाष भवर व पोलिस पाटील, केशवराव काळे यांच्या वीटभट्टी कारखान्यावरून मुलांच्या मदतीने ७०० विटा आणल्याआता. मैदान चांगले करण्यासाठी कार्यानुभव विषयाअंतर्गत श्रमाचा परिचय करून देण्यासाठी टोपली,विळा,भंगुणे आणायला लावलेडोंगर पोखरून त्याची . माती मुलांनी डोक्यावर शाळेच्या पटांगणात टाकून एकदम स्वच्छ चांगले मैदान तयार केलेपहारीने मोठाले. दगड उकरून काढले एक किमी .अंतरावरून विटा आणणे, माती टोपलीत भरून आणणे हे करताना मुलांच्या कपड्यांचे काय हाल झाले हे पाहण्यासारखे होते पण तरीही ते अतिशय उत्साहाने काम करायला उत्सुक होते. शाळेच्या प्रांगणात असणारा एक खूप मोठा दगड काढणे हे खूप मोठ काम होतदुधाळकर सर यांच्या . काळात त्या ंनी आपल्या कौशल्याने तो दगड काढून टाकला.

आमच्या बीटमध्ये २०१६ यावर्षी सामूहिक बालआनंद मेळावा आयोजित करण्यात आला होता त्या निमित्ताने आम्ही कैलास भोजे यांच्या शेतातील चिंचेखालुन नदीवर डब्बे घेऊन जेवायला गेलोनिसर्ग सानिध्यात त्या ठिकाणी एकत्र बसत . जेवन केले आणि ज्या मुलांना पोहायला येत त्यांना पोहायला वेळ दिलाकाहीनी नदीच्या पात्रातील वेगवेगळया आकाराची . दगड,पंख ,शिंपले जमा केली तर परत येताना चिंचा ही आणल्याआम्हाला रोज पिण्यासाठी पाणी प्रत्येक मुलांच्या . घरून एक जग भरून मुलेच आणत. काही वर्षानंतर श्री राठोड सर यांनी कळशी आणल्याने तर तीच भरून आणतकधी कधी . तीन दिवस गावात लाईट नसल्याने नळ यायचे नाही -तर तीन मुली पाणी /मग एक किमी अंतरावरून नदीवर जाऊन मुले नदीचे पाणी कोणत्याही स्वरूपाचे शुद्धीकरण न करता .आणत पावसाळयाच्या दिवसात .नळावाटे गावाला येत असेमुलांच्या पिण्याच्या पाण्याच्या बाटलीत खूप गढूळ पाणी दिसायचे तेच पाणी मुले प्यायचे यातून वेगवेगळे आजार होऊन गैरहजरीचे प्रमाण तीन ते चार दिवस जास्त राहायचे ते मला आजही आठवतेकाही. मुले पाणी बाटलीसोबत तुरटीचा खडा आणायचे तो फिरवून पाणी शुद्ध करून प्यायचे. नारायणराव गावाच्या पिण्याच्या पाण्याच्या टाकीत ब्लिचिंग पावडर टाकून पाणी स्वच्छ करत .

प्रत्येक मुलीला केसांची वेणी पाडून त्यावर रिबन लावून शाळेच्या गणवेशातच वेळेवर यावे अशी शिस्त श्री राठोड सर यांनी मुलांना घालून दिली होती९ सकाळीच.:३० च्या नंतर उशिरा येणाऱ्या मुलांची वेगळी रांग तयार करून त्यांना तंबी

दिली जायची त्यामुळे उशिरा कोणीच यायचे नाहीश्री राठोड . सर कवितेवर जास्त भर देऊन त्यांना खूप चांगल्या चाली लावत, सोबत कृतींची जोड दिल्याने तर कविता खूपच लवकर मुलांना पाठ होत होतीश्री जाधव सर यां.चे फलक लेखन खूपच छान असल्याने पहिला,दुसऱ्या वर्गाला शिकवत उत्तम पायाभरणी करत होतेसर्वच . विद्यार्थी शाळेत येत जो विद्यार्थी येणार नाही तो एक तर गावाच्या बाहेर जायचा नाही तर शेतात जायचा याचे कारण तो गावात असेल आणि आम्हाला माहिती झाले तर तीनचार मोठ्या म-ुलांना घेऊन त्याला आम्ही उचलून शाळेत आणत होतोएकदा तर सिद्धार्थ . खंदारे हा विद्यार्थी आपल्या घरात गादी खाली लपून बसला .होता संपूर्ण गाव शोधले, घर शोधले पण तो काही सापडला नाही अखेर तो गादीच्या खाली लपून बसला होता हे कळल्यावर त्याला तसंच उचललं आणि शाळेत आणलं या भीतीने अन्य कोणीच मुले लपून बसत नसतदिलीप पाईकराव . .याला तर नेहमीच या पद्धतीने आणावे लागायचे

श्री राठोड सर मुख्याध्यापक यांनी आपल्याकडे पदभार असल्याने पाचही वर्गासाठी पाच नेल कटर,पाच आरसे,पाच कंगवे आणल्याने शाळेत यायला मुलांना कधीच कंगवा सापडला नाही म्हणून उशीर होत नव्हतापरिपाठ झाल्यावर . प्रत्येक वर्गाचा मुखिया आठवड्यातून एकदा नेलकटरने ज्यांचे दररोज शनिवारी .नखे वाढलेत अशा सर्वांची नखे काढत होता खडे पिटीचे सात हात तर बैठे पिटीचे पाच हात,इतर शारीरिक कवायतीचा सराव नेहमीच घेतला जायचापहिल्या . वर्गाला पहिले दोन महिने फक्त निरीक्षण नंतर सरावांमध्ये समाविष्ट केले जायचेराठोड सर असतानी मुलांना लेझीमचे. सर्व हात शिकवले होते नंतर भांगडा हा लेझीमचा प्रकारही मुलांना सरांनी शिकवला होताडंबेल्सचे हात सराव मुलांकडून करून . कोणताही सण म्हटल .घेतली जात होते्यावर अगोदरच्या दिवशी सुतळीच्या दोरला पताके दरवर्षीत लावण्याची प्रथा आमच्या शाळेत प्रचलित होती त्यामुळे आकाश रंगीबेरंगी दिसायचे त्यासाठी लागणारी चिक्की ओंकार ,अक्षय तर कधी प्रह्लाद,पांडुरंग चव्हाण आपल्या घरून करून आणत होता. शालेय पोषण आहार योजनेची जेऊ घालण्याची पद्धत तर सर्वात चांगली होतीशाळेला . किचन शेड २०१२ पर्यंत नव्हते तेव्हा मंदिराच्या बाजूलाच चुल पेटवून तिथेच खिचडी शिजवली जायची त्यानंतर काही वर्षानी खूप लांब ग्रामपंचायत कार्यालयासमोर किचन शेड बांधल्यावर त्या ठिकाणावरून खिचडीची टोपले शाळेच्या पटांगणात आणली जात होती. सर्व मुले आपल्या आवडीने रांगेत चटईवर जेवायला बसतसहा जण आपल्या स्वयं.प्रेरणेने इतरांना वाढत सर्वांचे जेवण झाल्यावर ते जेवण करत होती हे सहा विद्यार्थी रोज आलटून पालटून बदलत होती प्रत्येक दिवशी वर्ग बदलत होता पण यासाठी ते कंटाळा कधीच करत नव्हती ज्या दिवशी मटकी हा मेनू असायचा त्याच्या अगोदरच्या दिवशी आम्ही मटकीला मोड यावेत म्हणून दिवसभर भिजवून संध्याकाळी एका रुमालात गुंडाळून बकेटीत झाकून ठेवत होतो . उद्याच्याला आलेले मोड यामुळे तर काही मुले तर कची मटकीवर ताव मारत होती. आमचा एकही दिवस शालेय पोषणाची खिचडी खाल्ल्याशिवाय जायचा नाहीआलेला . अधिकारीही त्याची चव चाखत होता.खाल्ल्यावर खूप छान बनवली असेच उदगार त्यांच्या तोंडून येत होतेवर्गखोल्या . 53 कमी असल्याने माझे दोन्ही वर्ग तिसरी व चौथीचे विदयार्थी घेऊन नाक्यावर असणाऱ्या किरमिडीच्या झाडाखाली शिकवत गेलो हे फक्त ऑक्टोबर महिन्यांनंतरच शक्य होत होतेकूलर लावल्यावाणी गारोगार हवा त्या . शिक्षकास खुर्ची म्हणून मोठा दगड तर .ठिकाणी येत होती मुलांना बसायला स्वच्छ जागा त्या ठिकाणी होती दिवस कसा .जायचा ते कळायचेच नाही

या नाक्यावर जाताना जाता येई पण येताना खूप मोठी घसरगुंडी होती त्यावरून येताना कधी पाय घसरून मुले पडत होती पण साली वर जायला पायऱ्या झाल्या तसा 2016 आमचा प्रवास सुखकर झाला होता.



शाळेतील हौदाला गावातील पाणीपुरवठा योजनेतून पाणीपुरवठा होत होता. त्याला आम्ही पाईप बसवून दांड करून झाडांना पाणी देत होतो.आम्ही शाळेत जायच्या अगोदरच सर्व मुले नळाला पाणी आले की झाडांना दांड करून पाणी देत होते. मुलांना असे चिखलात राहायला खूप आवडत होते त्यामुळेच आमच्या शाळेतील सर्व झाडे जगली.पाचवा वर्ग, कार्यालय वगळता सर्वच वर्गाची चाबी मुलांकडे होती. आम्ही शाळेत पोहोचायच्या अगोदर ते वर्ग उघडून सर्व साफसफाई करून घेत होते तसेच शाळा सुटायच्या अगोदर पाच मिनिटात सर्व वर्ग झाडून काढत होते. एक कमालीची शिस्त मुलांना होती कुणाला काही वस्तू सापडली तर ते लगेच आपल्या वर्गशिक्षकांना आणून

देत होते.जेवण केल्यानंतर आपली ताट ते स्वत: पाण्याने धुऊन घराकडे घेऊन जात होती.शाळाबाह्य स्थलांतर मुलांचा शोध मोहिमेअंतर्गत दोन विद्यार्थी विलास काळे यांच्या शेतात असणाऱ्या गड्याकडे आहेत अशी बातमी कानावर आली त्यापैकी एक ७ वर्ष तर दुसरा १० वर्षाचा मुलगा होता .आज या गावाला उद्या दुसऱ्या गावाला मजुरी करत फिरत असल्याने कोणत्याही शाळेत ते प्रवेशित झाले नव्हते पण आम्ही श्री रमेश क-हाळे सर,कांबळे सर मी आणि श्री बालाजी गोरे सर यांनी त्यांच्या आखाड्यावर जाऊन पालकांना समज देत समजूत घालत पुस्तके,गणवेश देऊन आमच्या शाळेत प्रवेशित केले होते.डोंगरगाव नाक्याच्या शाळेची प्रचिती जिल्हाभर झाली होती म्हणूनच सुकळी वळण आणि कडपदेव गावाचे काही विद्यार्थी आमच्या गाडीवर बसून डोंगरगावच्या शाळेत येत होते. अजय अरुण राठोड कडपदेव तर सुशील राठोड, मुन्नेश्र्वर पवार,वेदांत चंद्रवंशी असे भरपूर विद्यार्थी ये जा करत होते.काही स्वत:च्या गाडीने काही तर काही मदत मागून ऑटो करून येत होते.डोंगरगाव नाका या शाळेत गुणवत्तेच्या बाबतीत खूप चांगले काम चालू होतेशाळेत दरवर्षी शालेय . मंत्रिमंडळ स्थापन केले जायचे. निलेश उफाडे,प्रल्हाद चव्हाण, ओंकार भोजे, शुभम काळे, कुणाल मस्के,कुणाल चव्हाण,अविनाश चव्हाण यांनी मुख्यमंत्रीपदाचां पदभार सांभाळला होता याशिवाय शिक्षण मंत्री,सांस्कृतिक मंत्री,पर्यावरण मंत्री, आरोग्यमंत्री,स्वच्छतामंत्री,अन्न व भोजनमंत्री, क्रिडामंत्री,वाहतूकमंत्री अशी खाते वाटप मुलांमध्ये केल्यामुळे शाळेतील कामे पटापटा व्हायला मदत झालीशिवाय राजू मंच ., मीना मंच, माता पालक संघ, शिक्षक पालक संघ शाळेत स्थापन झाली होते .2007 या वर्षी शाळेतील मुलांनी नदीवर खूप मोठा बंधारा बांधला होता हे ही विशेष होतआमच्या दहा वर्षाच्या कालावधीत . श ाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष म्हणून श्री सुभाषराव मस्के, सुरेश मस्के, त्र्यंबक मस्के,आणि सुरेश गाडगे यांची निवड झाली होतीगावातील व्यक्तिमत्व शेषेराव मस्के यांना . दहा माणसांची .सगळेजण डॉक्टर या नावाने हाक मारत पंगत जेवण असलं तरीही ते श्लोक म्हणायला उत्सुकच असतदुपारच्या सुट्टीत जेवण झाले की कोणतेही लाकडी . पट्टी चेंडूफळी म्हणून अन्न जिरावे यासाठी श्री राठोड सर, जाधव सर, कऱ्हाळे सर, मी आणि तिसरी ते पाचवीचे विद्यार्थी क्रिकेट खेळत होतो. वॉल कंपाऊंडच्या वरून चेंडू गेला की छक्का तर भिंतीला धक्का लागला की चौका गणला जायचा दररोज खेळ रंगायचा हा आमचा दिनक्रम असायचा यामुळे अंगातील थंडीही निघून जायची. सर्वात मोठी अडचण व्हायची ती सावळेच्या घराची चेंडू थोडासा जरी उडाला तरी सावळेच्या घरच्या पत्रावर जायचा आणि रामा सावळेची आई म्हणजेच आजी एकच गलबला करायची कोणत आहे रे"ते कार्टम्हटलं की सगळी मुलं " आवाज.गायब व्हायची शांत झाला की मांजर पावलानी मुले पत्रावर जाऊन चेंडू काढत होतीएकदा तर खेळताना . जाधव सर यांनी मारलेला चेंडू अनिल बबन कांबळे याच्या .तोंडावर लागला तसेच तेगूळ त्याच्या कपाळावर आले

शाळेतील वर्गात कंटाळवाणेपणा येऊ नये म्हणून आम्ही वातावरण नेहमीच ताजेतवाने ठेवण्याचा प्रयत्न करत होतो म्हणून दुपारी माझे दोन्ही वर्ग तिसरी, चौथी नाक्यावर असणाऱ्या भल्या मोठ्या झाडाखाली भरवत होतो तिथून सात गावांचे दर्शन व्हायचं, खूप रम्य वाटायच याच ठिकाणी असणाऱ्या नाक्यावर कधी कधी सैर करायला मिळायची तेथे साळींदर या अतिशय दुर्मिळ असणाऱ्या प्राण्यांचा आवास होता, त्याचे काटे आजही तिथे सापडत होती काही मुले तर त्यांचा बिळात जायचा प्रयत्न करत त्यांना कोणत्या स्वरूपाची भीती वाटत नव्हती. २०१६ या वर्षी नाक्यावर डोंगरेश्वराचे मंदिर झाल्यावर शांतपणा जाऊन गजबज सुरू झालीलोकांची आवक नाक्यावर . भगवान भोजे सारखे भक्त भजन करत त्यांचे भजन .झाली शाळेला वर्गखोलीची .होईपर्यंत आम्ही शांत बसत होतो कमतरता होती त्यावेळी गावातील सर्व ज्येष्ठ नागरिकांना बोलावून वर्गखोली शासनाकडून मान्य आहे पण जागा नाही अशी कल्पना दिल्यावर गावकऱ्यांनी तहसीलदारांच्या मदतीने गायरानाची दोन एकर जागा शाळेच्या नावाची करून दिलीनमुना नंबर आठ प्राप्त होताच आम्ही शाळेची . जागा गावकऱ्यांच्या मदतीने त्यावेळचे गटशिक्षणाधिकारी श्री पातळे साहेब, श्री गोरे सर हे येतात मोजून घेतलीत्या . ठिकाणी पावसाळ्याची दिवसात झाडेही भरपूर लावण्यात आली होती जर शाळा तयार झाली तर एक खूप मोठे पर्यटक स्थळ होईल असा मनोदय लोकांनी व्यक्त केला होता. शाळेची खोली ही पूर्वेकडे तोंड करूनच होईल असा आम्ही निर्धार केला होताशाळेचा परिपाठही विद्यार्थीच . उद्या .घ्यायचे कोणता वर्ग परिपाठ घेणार यांचे नियोजन अगोदरच ठरलेले असायचेसोमवार .,मंगळवार मराठीत, बुधवार, गुरुवार इंग्रजीत, शुक्रवार, शनिवार हिंदीत परिपाठ घेतला जायचा, तीन विद्यार्थी समोर जायचे ज्यांना समोर बोलायचे त्यांना फोन लावून बोलवले जायचे. नागेश चव्हाण हा घोषणा देण्यात खूपच चांगला होता. एका वर्षी ढोलक्याची वाडी केंद्रावरती प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने खेळांच्या स्पर्धांचे आयोजित करण्यात आले होते या ठिकाणी बक्षीस मिळावे यासाठी मी शाळा सुटल्यावर महिनाभर सराव घेतला पण ढोलक्याच्या वाडीचे खूप मोठाले विद्यार्थी आणि खेळण्यात तरबेज होते त्या विद्यार्थ्यांनी आमच्या विद्यार्थ्यांना वाऱ्यासारखे फेकून दिल आमची काही डाल शिजली नाही.. कबड्डी असो की खो खो कोणत्याही स्पर्धेत आमचा क्रमांक आला नाही पण गाण्याच्या स्पर्धेत प्रह्लाद कलाने याने प्रथम क्रमांक मिळवला ही आमच्यासाठी एक अभिमानाची गोष्ट झाली होती.

जेव्हा जेव्हा आम्हाला रिकामा वेळ मिळायचा तेव्हा तेव्हा आम्ही रानमाळांत भटकंती करत होतो२०१७.

यावर्षी आम्ही शिवानी कैलास भोजेच्या शेतातील चिंच झाडाच्या चिंचा खायला कांबळे सर सोबत गेलो होतो त्यावेळी झाडाला खूप चिंचा लागल्या होत्या त्या खालून तोडणे अवघड होतं मग चिंचा तोडायच्या कशा असा प्रश्न पडला तेवढ्यात अश्विनी भोजे हिरकणीसारखी, एखाद्या खारीप्रमाणे पटापटा झाडाच्या शेंड्यावर चढली आणि तिने खूप चिंचा तोडून खाली टाकल्याएक चिंच खाल्ली की . लगेच दात आंबटले म्हणून पिकलेल्या, पाडाच्या चिंचा झोऱ्या भरून घरी नेलात्यावेळचा चिंचा., हरभरा तोडण्याचा व्हिडिओही आम्ही चित्रित केला.

आमच्या शाळेतील स्वप्निल रणखांब या मुलाच्या आवाजात एक वेगळीच जादू होतीआम्ही कविता चालीवर . शिकवल्यावर मुलांकडून मुकपाठ वदवून घ्यायचोदरम्यान . त्याला .आम्हाला स्वप्निलच्या मंजुळ सुराचा शोध लागला कोणतीही कविता दिली तर त्या कवितेला तो उत्कृष्ट आणि एकदा .वेगळीच मनाला मोहित करणारी चाल लावत होता सहजच मी त्याच्या कवितेच्या चालीचा ऑडिओ तयार केला आणि तो आमच्या कळमनुरी बीटच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर टाकला.सर्वांनाच त्याची चाल,आवाज आवडला मग तेव्हापासून स्वप्निल रणखांबच्या कवितांना संपूर्ण जिल्हाभरात मागणी आलीएकदा तर कळमनुरी बीटमध्ये . असोलवाडी या गावी केंद्रसंमेलनात त्याला कविता गाण्यास १०० बोलवले आणि बक्षीस स्वरूपात कोणी,कोणी ५०० अशी २२०० रुपयांच्या स्वरूपात देणगीही जमा झाली. भविष्यात हा चांगला गायक होईल अशी सर्वांनी प्रतिक्रिया दिली त्याचाच भाऊ मंगेश हाही त्याच्या पावलावर पाऊल ठेवणारा होता त्याच्याही आवाजात तसाच दम होता. तो त्यावेळी वर्ग दुसरीत शिकत होताआमच्या शाळेतील आम्हाला कोणत्याह.ी स्वरूपाची अडचण आल्यास आम्ही वसंतराव भोजे यांना बोलावत होतोक्रिकेट सामने पाहण्याचा. आम्हा सर्वांना खूपच नाद होता जेव्हा जेव्हा सामने असायचे तेव्हा ते पाहण्यासाठी सर्व शिक्षक वसंतराव भोजे यांच्या घरी जात होतो. पोहे, चहा तर नेहमीच त्यांच्याकडून आम्हाला होत असत . वसंतराव भोजे त्यावेळी शेतीसोबतच पिठाची चक्की २६ दरवर्षी.चालवत होते जानेवारी म्हणजेच प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने वेगवेगळया स्वरूपाच्या मैदानी स्पर्धांचे आयोजन केले जायचे त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना या स्पर्धांचे डोहाळे लागायचे यात आम्ही १०० मीटर धावणे, बेडूक उड्या मारणे, टाचेवर चालणे, पोत्यांची शर्यत, लेझीम वाजवणे, दोरीवर उड्या मारणे, कबड्डी, खोखो-, लांब उडी मारणे, गोळा फेक करणे, बुद्धिबळ,क्रिकेट खेळणे अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले जात होतेप्रत्येक. विद्यार्थी आपल्याला जास्तीत जास्त बक्षीस कशी मिळतील याचा प्रयत्न करत होता त्या विद्यार्थ्यांना पेन, वही, स्केलपट्टी अशा स्वरूपात बक्षीस दिली जात होती . एका वर्षी तर दुर्गा पोले या विद्यार्थिनींनी सात स्पर्धांमध्ये बक्षीस मिळवलं होतं प्रत्येक स्पर्धेत ती वरचढ ठरत होती. प्रत्येक वर्षी आम्ही नेहमीच भटकंती करत होतोकधी डोंगरावर .,कधी शेतात, कधी धरणावर तर कधी माळरानावर फिरायला जायचो सीताफळाचे फोटो काढून वेगवेगळया सोशल . मीडियावरती पाठवत होतो त्यावेळी श्री सोनुने साहेब यांनी आम्हाला तोतोचानची उपमा दिली होतीशाळेत . दत्त मंदिराच्यासमोर असणारे चाफ्याचे झाड हे कित्येक वर्षापासून त्या ठिकाणी जिवंत आहे. गावातील कित्येक पिढ्या त्याने पाहिल्या तरीही ते झाड ताठच उभे आहे . संपूर्ण शाळेची ते झाड शोभा होते त्यांचे फुले संपूर्ण गाव घेऊन जात होते पण फुले काही संपायची नाहीत असा .त्याला बहार येत होता



आम्ही जेव्हा शाळेवर नियुक्त झालो तेव्हा फक्त पांचवी पर्यंतच वर्ग होते त्यांनंतर मुलांची खूप हेळसांड होत होती म्हणून आम्ही 2017 साली वर्ग सहावा तर 2018 ला सातवा वर्ग वाढवला त्या मुलांना शिकवायला शिवाजी मस्के व सीमा पाईकराव यांची नेमणूक केली होती त्यांचा पगार लोकसहभागातून दिला जात होता. शिवा मस्केला मास्तर हे नाव तेव्हापासूनच पडले.ज्या दिवशी बदली तो दिवस होता 28 मे 2018 त्यानंतर जून महिन्याच्या 12 तारखेला शालेय पोषण आहार आला होता तो उतरण्यासाठी तेव्हढा शाळेत गेलो होतोनवीन शाळेवरती . रुजू झाल्यानंतर28 नोव्हेंबर 2018 रोजी श्री कांबळे सर, श्री श्रीनिवास कोल्हाले सर यांनी दुधाळकर सर, कहाळे सर - व माझा निरोप घेण्यासाठी निरोप समारंभाचा कार्यक्रम हा कार्यक्रम म्हणजे आतापर्यंत केलेल्या .आयोजित केला मुले अतिशय .कार्याचा एक संकलनाचा नमुनाच होता सर्व शिक्षक आणि या कार्यक्रमासाठी .भावनिक झाली होती उपस्थित असलेले नारायण चव्हाण,शिवा मस्के असे पालकही खूप भावनिक झाले होते काय बोलावं हेच सुचत नव्हतंसोशल मीडियावरती आपण शिक्षक बदली करून .. गेल्यानंतर मुलांना किती दुःख होतं याचे खूप व्हिडिओ .व्हायरल होतात त्यापेक्षाही हा व्हिडिओ खूप मार्मिक होता कुणाल मस्के सारखे विद्यार्थीभाषण करताना अक्षरशः खूप रडले हे कधीही न विसरता येणार आहे...



**संदर्भ ग्रंथ:-**

1) माझी नाक्याची शाळा एक अविस्मरणीय आठवण – शंकर देवराव लेकुळे

2) माझी शाळा माझे उपक्रम –- शंकर देवराव लेकुळे